नवमहाराष्ट्र शिक्षण मंडळाचे,

# आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय शेवगाव.

शैक्षणिक वर्ष :— 2020-21

प्रशिक्षणार्थीचे नाव :– बढे प्रांजली पंढरीनाथ

हजेरी क्रमांक :– 33

कोर्सचे नाव :– शालेय विद्याशाखांचे आकलन आणि शालेय विषय

कोर्स कोड :– 106 (भूगोल)

प्रात्यक्षिकाचे नाव :– भौगोलिक क्षेत्राला भेट आणि अहवाल लेखन

मार्गदर्शक प्राध्यापक :– प्रा. स्मिता नाईक

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटकाचे नाव | पान.नं. |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | 3 |
| 2 | ऋणनिर्देश | 4 |
| 3 | भौगोलिक भेटीचे शैक्षणिक महत्व | 5 |
| 4. | क्षेत्रभेटीचा उद्देश | 6 |
| 5 | क्षेत्रभेटीचे नियोजन | 7 |
| 6. | प्रत्यक्ष कार्य | 8-13 |
| 7 | क्षेत्रभेटीचा प्रभाव | 14 |
| 8. | अभिप्राय | 15 |
| 9 | अहवाल | 16 |
| 10 | प्रत्यक्ष अनुभव | 17 |
| 11 | क्षेत्रभेटीचा उपयोग | 18 |
| 12 | समारोप | 19 |

Page :
Date : / /

# प्रस्तावना

बी.एड. प्रथम वर्ष अभ्यासक्रमामध्ये सावित्री बाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत विषय 106 भूगोल या विषयाच्या प्रात्यक्षिक कार्याच्या पूर्ततेसाठी आम्ही क्षेत्रभेट जायकवाडी धरण 'पैठण' येथे आयोजित केली होती. त्या ठिकाणाची भौगोलिक स्थिती, वैज्ञानिक दृष्टीकोन, मृदा बांधणी, पाण्याचे संवर्धन विद्यार्थ्यांना माहिती होण्यासाठी सदर क्षेत्रभेट प्रकल्प लिहिला आहे.
यामध्ये आपण धरणाचे चयन ठिकाण क्षमता, वनस्पती, प्राणी व परिसर अशा परिस्थितीची माहिती घेतलेली आहे. या प्रकल्प लेखनातून आम्हाला सदर भौगोलिक ठिकाणाची प्रारंभिक प्राकृतिक रचना पर्यावरणातील घटकांचे निरिक्षण तेथील परिसर औषधी वनस्पती, पारंपारिक स्त्रोत, जमिन डोंगरमाथ्यावरची पाण्याचे स्त्रोत धरणाची बांधणी, त्या ठिकाणची विजनिर्मिती पक्षी, मासेमारी, पाण्याची पातळी, गावातील परिसर त्या ठिकाणची जमिन व पिके अशा प्रकारची माहिती या परिसर अभ्यासातून किंवा क्षेत्रभेट आयोजनामुळे झाली हे दिर्घ काळ लक्ष्यात राहिल. या अहवाल लेखनाचे महत्व म्हणजे आम्हाला भौगोलिक घटकांची माहिती मिळालीच तसेच शालेय कामकाजातून निसर्गरम्य वातावरणात एक वेगळ्या सहलीचाही आनंद लुटता आला.

Scanned with CamScanner

# ऋणनिर्देश

नवमहाराष्ट्र शिक्षण मंडळाचे आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय शेवगाव शैक्षणिक वर्ष 2020-21 रोल क्रमांक 106 भूगोल अंतर्गत भौगोलिक क्षेत्राला भेट आणि अहवाल लेखन करणे हे प्रात्यक्षिक निवडण्यात आले.

मला हे प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उद्धमले आर. एन. यांनी संधी दिली. त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

तसेच या विषयाचे मार्गदर्शक प्रा. स्मिता नाईक मॅडम यांनीही मला वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. काळे सर यांनीही वेळोवेळी पुस्तकांची पुर्तता केली त्याबद्दल मी त्यांचीही ऋणी आहे.

तसेच हे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करत असताना मला ज्या ज्ञात व अज्ञातांनी मदत केली त्याबद्दल मी सर्वांची ऋणी आहे.

Scanned with CamScanner

Page:
Date: / /

# शैक्षणिक महत्त्व

"पैठण" महानगर जायकवाडी धरण या क्षेत्रभेटी-मुळे आम्हाला विविध माहिती मिळाली:-

① परिसरातील जैवविविधतेची माहिती मिळाली.

② आम्हाला तेथील विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींची माहिती मिळाली.

③ या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली.

④ या क्षेत्रभेटीमुळे निरिक्षणशक्ती वाढण्यास मदत झाली.

⑤ कृतीयुक्त शिक्षणातूनच प्रत्यक्ष शिक्षण मिळते.

⑥ तर्कशक्ती विकसित होते.

⑦ कौशल्य, अभिरुची विकसित होते.

Page:
Date: / /

# क्षेत्रभेटीचा उद्देश

एखादया ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन तेथील वैज्ञानिक माहिती, भौगोलिक स्थिती जाणून घेणे हा क्षेत्रभेटीचा प्रमुख हेतू असतो.

क्षेत्रभेटीत प्राकृतिक, सांस्कृतिक पर्यावरणातील घटकांचे निरिक्षण करणे, सर्वेक्षण करून माहिती संकलित करणे. माहितीच्या आधारे अहवाल तयार करणे. अपेक्षित असते.

प्रत्येक व्यक्ति कोणतीही कृती करताना मनात एक उद्देश ठेवते. याप्रमाणेच आम्हास हदा त्या ठिकाणच्या वैज्ञानिक घटकांच्या अभ्यास करण्यासाठी ही क्षेत्रभेट आयोजित केली होती. या क्षेत्रभेटीतून आम्ही तेथील औषधी वनस्पती, मृदा, हवा, पाणी, प्राणी, पक्षी, तांत्रिक घटक, ऊर्जास्त्रोत, जलपरिसंस्था, लोक-जीवन, व्यवसाय, यांची प्रत्यक्ष माहिती घेवून त्या आधारे त्या घटकावर चर्चा केली व विदयार्थ्यांना त्या ठिकाणची सविस्तर माहिती मिळाली.

महाविदयालयीन शिक्षण घेत असताना परिसर अभ्यास महत्वाचा असतो. म्हणून या क्षेत्रभेटीतून खूप काही लक्षात आले व ते दिर्घकाळ लक्ष्यात राहील.

Scanned with CamScanner

# क्षेत्रभेटीचे नियोजन

दररोजच्या प्रत्येकाच्या जीवनात नियोजनाला असाधारण महत्व आहे. आपण दैनंदिन जीवनात विविध बाबींचे निरिक्षण करतो. तसेच आम्हाला अभ्यासक्रमासहचे असणाऱ्या उपक्रमांतर्गत भूगोल क्षेत्रभेट आहे.

त्यानुसार आमच्या भूगोल विषयाच्याशिक्षिका प्रा. स्मिता नाईक मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सूचविले कि आपण पैठण येथे 'जायकवाडी धरण' या ठिकाणी भेट देऊन त्या ठिकाणची हवा, वनस्पती, पक्षी, प्राणी, व्यवसाय, पाणी, ऊर्जास्त्रोत वसाहत त्या ठिकाणचे धार्मिक स्थळ या सर्व घटकांच्या माहितीचे संकलन करु.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी पैठण येथील जायकवाडी धरण या ठिकाणी क्षेत्रभेट देण्याचे नियोजनास प्रारंभ केला. त्यानंतर सर्वानुमते 2021 या दिवशी क्षेत्रभेट निश्चित केली. तसेच महाविद्यालयातील प्राचार्य आणि प्राध्यापकांनी वाहनाची सोय करुन दिली अशा प्रकारे क्षेत्रभेटीचे नियोजन करण्यात आले. आणि त्यानंतर पैठण या ठिकाणी क्षेत्रभेट देण्यात आली व तेथील प्राकृतिक व मानवी घटकाविषयी निरिक्षण करण्यात आले.

Scanned with CamScanner

# प्रत्यक्ष कार्य

सदर क्षेत्रभेटीमध्ये आम्ही विविध प्रकारचे निरिक्षण करून नोंदी केल्या. त्यानुसार प्रत्यक्ष कार्याचा आढावा घेण्यात आला. प्रत्यक्ष भूगोल क्षेत्रभेट प्रकल्पात आम्ही प्रत्यक्ष पुढील गोष्टींचा अभ्यास केला.

**परिसर :-** या ठिकाणी गेल्यानंतर आम्हाला जायकवाडी धरण व त्याठिकाणचा परिसर पहायला मिळाला. त्या ठिकाणी धरणा समोवताली विविध पक्षी, प्राणी, वनस्पती, मासे, झुडपे पहावयास मिळाले तसेच धरणाकाठी जे हवामान होते ते भिन्न स्वरूपाचे होते व त्या ठिकाणचे वातावरण सर्वसामान्यतः हा वेगळे होते. त्याच बरोबर त्या ठिकाणी विजनिर्मिती प्रकल्प आम्ही समक्ष पाहिला.

**भूपृष्ठरचना :-** जायकवाडी धरण हे गोदावरी नदीवर असलेले महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यामधील एक प्रमुख धरण असून मराठवाड्यातील जवळजवळ 2.50 लाख हेक्टर क्षेत्र या धरणामुळे ओलिताखाली आलेले आहे. धरणाची क्षमता 102TMC इतकी आहे.

**वनस्पती :-** धरणाच्या पायथ्याशी विविध वनस्पती आढळल्या त्याचबरोबर धरणाच्या भिंतीच्या ओलावा आहे त्या ठिकाणी तेथे विविध पिके घेतली जातात. धरणाच्या आतील बाजूस दगडे लावलेली आहेत. म्हणून त्या ठिकाणी नैसर्गिकरित्या काही झुडपे उगलेली आहेत. परंतु धरणाच्या उजव्या बाजूस दोन किलो मीटर अंतरावर पर्यटनाच्या दृष्टीने जायकवाडी बाग दिसला.

**धरणाची बांधणी / रचना :-**

हे गोदावरी नदीपर असलेले महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यामधील एक प्रमुख धरण असून मराठवाड्यातील जवळजवळ 2.40 लाख हेक्टर क्षेत्र या धरणामुळे ओलिताखाली आलेले आहे. 60 किलोमीटरची लांबी आणि 10 किलो-मीटरची रुंदी एवढा मोठा पसारा असलेल्या या नाथसागराची आशिया खंडातील सर्वात मोठे मातीचे धरण अशी ओळख आहे. त्या धरणाचा उपयोग एकदा भरले तर दोन वर्षाच्या शेतीच्या पाण्याची आणि चार वर्षाच्या पिण्याच्या पाण्याची सोय होते. म्हणून या धरणाला मराठवाड्याचा खोरा समृद्ध समजला जातो.

| | |
|---|---|
| धरणाचा उद्देश :- | सिंचन, जलविद्युत |
| अडवलेल्या नद्या / प्रवाह :- | गोदावरी नदी |
| स्थान :- | पैठण, औरंगाबाद जिल्हा, महाराष्ट्र |
| सरासरी वार्षिक पाऊस :- | 755 मि. मी. |
| लांबी :- | 9997.67 मी. |
| उंची :- | 41.3 मी |
| बांधकाम सुरु :- | 1965 |
| उद्घाटन दिनांक :- | इ.स. 1976 |
| ओलिताखालील क्षेत्रफळ :- | 35000 हेक्टर |
| क्षमता :- | 2170 दशलक्ष घन. मी. |
| क्षेत्रफळ :- | 350 वर्ग. कि.मी. |
| स्थापित उत्पादनक्षमता :- | 12 मेगावॅट |

Scanned with CamScanner

## धरणाची माहिती :-

बांधण्याचा प्रकार मातीचा भराव दगडी बांधकाम
उंची : 41.3 मी (सर्वोच्च) लांबी : 9997.67 मी

## दरवाजे :-

प्रकार : S- आकार लांबी : 471 मी.
सर्वोच्च विसर्ग : 22656 घनमीटर / सेकंद
संख्या व आकार : 27 (12.50x7.99 मी)

## पाणीसाठा :-

क्षेत्रफळ : 350 वर्ग कि.मी.
क्षमता : 2909 दशलक्ष घनमीटर
वापरण्यायोग्य क्षमता : 2170 दशलक्ष घनमीटर
ओलिताखालील क्षेत्र : 35000 हेक्टर
ओलिताखालील गावे : 105

## डावा कालवा :-

लांबी : 208 कि. मी.
क्षमता : 100.80 घनमीटर / सेकंद
ओलिताखालील क्षेत्र :- 263852 हेक्टर
ओलिताखालील शेतजमीन :- 237452 हेक्टर

## वीज उत्पादन

जलप्रपाताची उंची 94 फूट जास्तीतजास्त
विसर्ग 50 क्यूमक्स
निर्मिती क्षमता 12 मेगा वॅट विद्युत जलित।

Scanned with CamScanner

Page:
Date: / /

12

# जायकवाडी पक्षी अभयारण्य :-

नाथसागर जलाशयाचा विस्तार 55 किमी लांब आणि 27 किमी रुन्द आहे.
10 ऑक्टोबर 1986 रोजी हे क्षेत्र पक्षी अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले. अभयारण्याचे भौगोलिक स्थान 19° 29° उत्तर आणि 75° 22' 12 पूर्व असे आहे.

जायकवाडी जलाशयात माशांच्या 50 पेक्षा अधिक जाती आढळतात. पाणपक्ष्यांना प्रिय असणारी दलदल, शेवाळ, पानवनस्पती, छोटे मासे कीटक या खाद्यपदार्थांची आणि वैविध्यपूर्ण जलीय अधिवासाची विपुलता यामुळे नाथसागराकडे देशी - विदेशी पक्षी आकर्षित होतात. या जलाशयाच्या परिसरात सुमारे 200 स्थानिक आणि सुमारे 70 स्थलांतरीत विविध पक्षी आढळतात. जायकवाडी जलाशयावर रोहित, मत्स्य, गरुड, रंगीत करकोचा, लालसरीबदक, कापड्या बदक व गरुडांचे प्रकार, मालभिंगरी कमळ, नीलकमल विविध सुरय जातींचे पक्षी ढकद कंकू बदक पाणकावळे, राखी बदक मैना, पोपट, कोठरी, लावट, चंडोल, हीवट चक्रणक सलाना पावशा सातमार, घुबड सातभाई सूर्यपक्षी यासारखे अनेक पक्षी पहायला मिळतात.

Scanned with CamScanner

## वनस्पती / झाडे :-

जायकवाडी जलाशय क्षेत्रात झाडोरा कमी असला तरी जलाशयाच्या काठेच्या बाजूने लिंब, आंबा, आंमूळ, चिंच, वड, शिसम, उंबर, सुबाभूळ, आमलवार्स, चंदन यासारखे वृक्ष आहेत तसेच येथे सुमारे 37 सपुष्प जातीच्या वनस्पती आढळतात.

नोव्हेंबर ते मार्च हा जायकवाडी पक्षी अभयारण्याला भेट देण्याचा उत्तम काळ आहे. जलाशयाशेजारी पाटबंधारे विभागाची सागर सदर्शन आणि नाथसागर सदर्शन आणि नाथसागर, विश्रामगृहे आहेत. ह्या ठिकाणी पर्यटनाला गेल्यानंतर खूप बर वाटत आनंद मिळतो.

## धार्मिक स्थळ :-

पैठण भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक गाव आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्याचे ते मुख्य ठिकाण आहे. औरंगाबादपासून ते 50 कि.मी. अंतरावर गोदावरीकाठी ते वसले आहे. पैठण हे तेथिल संत एकनाथांची समाधी जायकवाडी धरण, ज्ञानेश्वर उद्यान, तसेच पैठणी साडी, यांच्यासाठी प्रसिद्ध आहे. पैठण येथे येण्यासाठी नगर व औरंगाबाहून अनेक वाहने उपलब्ध आहेत.

# क्षेत्रभेटीचा प्रभाव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत चालणाऱ्या मूल्यमापन योजना मध्ये नवमहाराष्ट्र शिक्षण मंडळाचे आपले आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शेवगाव या ठिकाणी शैक्षणिक वर्ष 2020-21 या वर्षे विषय कोर्स कोड 106 भूगोल अंतर्गत भौगोलिक ठिकाण क्षेत्रभेट व त्यावर अहवाल लेखन हे प्रात्यक्षिक कार्य दिले होते या प्रात्यक्षिकाचा फायदा सर्व विद्यार्थ्यांना झाला आहे. येथे आम्हाला येथे आम्हाला भूगोल विषयाचीच नव्हे तर विज्ञान या विषयाबद्दल देखील माहिती मिळाली. या क्षेत्रभेटीमुळे आम्हाला भूगोल विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त झाले.

तसेच शेवगावाहून 30 कि.मी. अंतरावर असलेल्या पैठण येथील एकनाथ महाराजांचे दर्शन देखील झाले तेथील दळणवळण सुविधा सुद्धा चांगल्या दिसून आल्या पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाणारे पैठण शहर पाहून झाले व जायकवाडी धरणाचा देखील सखोल अभ्यास त्या ठिकाणी क्षेत्रभेटीतून झाला.

क्षेत्रभेटीमुळे सर्व प्रशिक्षणार्थींना खूप काही अभ्यासायला मिळाले.

Scanned with CamScanner

# अभिप्राय

आम्हाला या क्षेत्रभेटीमुळे विविध प्रकारची सविस्तर माहिती मिळाली व माहितीचे संकलन करण्यात आले. या अहवालात मला धरणा- विषयी त्याची क्षमता बांधणी, त्यावरील शेती, व्यवसाय, त्यातील मासे, त्याकाठी असणारे, झाडे-झुडपे, वनस्पती, हवामान, जमीन अशा अनेक प्रकारची माहिती संकलित करता आली.

आम्हाला याठिकाणी (जायकवाडी धरण) पैठण क्षेत्रभेटीसाठी परवानगी दिली म्हणून महा- विद्यालयाचे प्राचार्य यांचे आभार, तसेच या क्षेत्रभेटीमध्ये अनेक प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले म्हणून त्यांनाही धन्यवाद देते. सदर प्रकल्प पूर्ततेसाठी आमच्या भूगोल विषयाच्या प्रा. स्मिता नाईक यांनी माहिती दिली. सदर प्रकल्पासाठी सर्वच प्रशिक्षणार्थी विद्या- र्थ्यांनी माहिती संकलित केली.

# अहवाल

स्थळ : जायकवाडी धरण (नाथसागर) पैठण
ता· पैठण जि· औरंगाबाद, महाराष्ट्र

नवमहाराष्ट्र शिक्षण मंडळाचे आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय शेवगाव भूगोल क्षेत्रभेटीसाठी जायकवाडी धरण (नाथसागर) पैठण येथे आयोजन करण्यात आले.

नाथसागर असे या ठिकाणाचे नाव आहे. त्याची सुरवात धोरणाच्या परिसरापासून होते. जायकवाडी धरण शेवगाव पासून 30 किमी अंतरावर आहे. आम्ही सकाळी घरून जेवण करून एस· टी· बस ने प्रवास करून 11.00 वाजता त्या ठिकाणी पोहचलो. व त्या ठिकाणी दुपारी 2 वाजेपर्यंत विविध पाहणी व माहिती संकलित केली. व दुपारचे जेवण केले. त्या नंतर एकनाथ महाराजांच्या मंदिरात गेलो व दर्शन घेऊन ठिक चार वाजता परतीचा प्रवास सुरू केला.

# प्रत्यक्ष अनुभव

या क्षेत्रभेटीमुळे आम्हाला निसर्गरम्य अशा वातावरणात गेल्यावर खूप माहिती मिळाली. त्या ठिकाणी गेल्यावर विविध माहिती संकलित केली.

क्षेत्रभेटीत प्राकृतिक, सांस्कृतिक पर्यावरणातील घटकांचे निरिक्षण करणे, सर्वेक्षण करणे माहिती संकलित करणे. माहितीच्या आधारे अहवाल तयार करणे अपेक्षित असते. प्रत्येक व्यक्ती कोणतीही कृती करताना मनात एक उद्देश ठेवते. याप्रमाणेच आम्ही सुद्धा त्या ठिकाणच्या वैज्ञानिक घटकांच्या अभ्यास करण्यासाठी ही क्षेत्रभेट महत्वाची ठरली. त्या ठिकाणी आम्ही जायकवाडी धरणाची भौगोलिक माहिती घेतली. त्या ठिकाणी त्या ठिकाणचे दळण-वळण प्रमुख उद्योग त्या ठिकाणचे धार्मिक स्थळ या सर्व गोष्टींची प्रत्यक्ष पाहणी केली व प्रत्यक्ष अनुभव घेतला.

Scanned with CamScanner

# क्षेत्रभेटीचा उपयोग

प्रशिक्षणार्थी शिक्षकांना या क्षेत्रभेटीमुळे विविध प्रकारचे उपयोग झाले.

1. प्रात्यक्षिक म्हणून केलेल्या या प्रकल्पामुळे मला भौगोलिक घटकांचे सखोल ज्ञान मिळाले.
2. या प्रकल्पामुळे मला तर्कशक्ती वाढण्यास मदत झाली.
3. या क्षेत्रभेटीमुळे अध्ययन - अध्यापन तंत्रामध्ये समाविष्ट असलेल्या घटकांचा कशा प्रकारे उपयोग होतो. हे समजले.
4. विविध औषधी वनस्पतींची माहिती मिळाली.
5. लोकजीवनाचे नवनवीन पैलू समजले.
6. क्षेत्रभेटीतून आमच्या सर्वांगीण विकासास चालना मिळाली.

① (15)

# समारोप

नवमहाराष्ट्र शिक्षण मंडळाचे, आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शेवगाव. शैक्षणिक वर्ष 2020-21 कोर्स कोड 106 भूगोल अंतर्गत भौगोलिक क्षेत्राला भेट आणि अहवाल लेखन या प्रात्यक्षिकासाठी निवड करण्यात आली.

हे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करत असताना छात्राध्यापकाला भौगोलिक स्थळाविषयी माहिती मिळाली. या विषयाच्या प्रात्यक्षिक कार्याच्या पूर्ततेसाठी आम्ही पैठण जायकवाडी धरण (नाथसागर) येथे आयोजित केली होती.

त्या ठिकाणाची भौगोलिक स्थिती वैज्ञानिक दृष्टीकोन सुद्धा, बांधणी, पाण्याची स्थिती, हवामान, वैज्ञानिक दृष्टीकोन, प्राण्यांचे संवर्धन झाडे झुडपे या सर्वांची भौगोलिक माहिती होण्यासाठी सदर क्षेत्रभेट आयोजित केली गेली व संबंधित अहवाल लेखन केले.

अशा प्रकारे हे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यात आले.

Scanned with CamScanner